पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३८१ दिनांक - २४/०५/२०२३**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## जेष्ठ नागरीकाची दोन लाखांची फसवणुक करणा-या टोळीस केले जेरबंद

दि.०३/०५/२०२३ रोजी फिर्यादी यांची २,००,०००/- रुपयांची फसवणुक केली म्हणून त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.१२२/२०२३ भादवी कलम ४२० अन्वये गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाचा तपास सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सावळाराम साळगांवकर व पोलीस निरीक्षक,(गुन्हे),मनोज शेडगे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,समीर शेंडे व तपास पथकाचे पोलीस स्टाफने तपास सुरु केला.

मिळालेल्या माहितीवरून यातील आरोपी नामे **१)हर्षद कुंडलीक पवार,वय २४ वर्षे,रा. मु.पो.दोनवडे,ता.करवीर,जि.कोल्हापुर २)फैयाज अली मोकाशी,वय ३७ वर्षे,रा.मु.पो. येळापुर, सैय्यदवाडी,ता.शिराळा,जि.सांगली सध्या रा.पुणसगी ता.कालेकोट,जि.सुरपुर, बेंगलोर,राज्य कर्नाटक यांना कात्रज,पुणे येथुन व यातील मुख्य सुत्रधार ३)युवराज बाळासो पाटील,वय ३८ वर्षे,रा.सेक्टर नं.१९,अनिरुध्द हाईट्स,नेरुळ,नवी मुंबई** यास नवी मुंबई येथुन ताब्यात घेवुन, त्यांचेकडे तपास करता,त्यांनी दाखल गुन्हा केल्याचे निषपन्न झाल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक केली आहे.

यातील आरोपी हे त्यांचेकडील चार चाकीवाहन हे तारण अथवा विक्री करण्याचा बहाणा करून नागरीकांकडून पैसे घेतात व तारण अगर विक्री केलेले वाहन त्यांचेकडील दुसरे चावीने परस्पर घेवुन जावुन नागरीकांची फसवणुक करतात. तसेच त्यांनी स्वारगेट पुणे व धनसोली,नवी मुंबई येथे अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पुणे शहरात अथवा इतर ठिकाणी अशा स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्यास सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर येथे संपर्क साधावा. नमुद आरोपींची दि.२५/०५/२०२३ रोजीपर्यंत मा.न्यायालयाने पोलीस कसटडीची रिमांड मंजुर केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग श्री.नारायण शिरगावकर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सावळाराम साळगांवकर, मा. पोलीस निरीक्षक,(गुन्हे),मनोज शेडगे यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,समीर शेंडे, पोलीस अंमलदार,बापु खुटवड, सुशांत फरांदे, बजरंग पवार, महेश मंडलिक, नवनाथ शिंदे, सागर सुतकर, सागर कुंभार, विशाल वाघ, खंडु शिंदे यांनी केली आहे.